ग्रं. सं. ठाणें
काव्य
८५६
१९२३

कुळी-या संस्थेस
पुष्प १ लें.



# श्रीकृष्ण-जन्म-पद्यहार.

रचणार
कवि-शाहीर ग. जी. राजे.

REFBK-0002355
REFBK-0002355

श्रीकृष्ण जन्माष्टमीसाठीं
र्पण केलें आहे.

वई. १९२३

किंमत छपाई खर्चासाठीं दीड आणा.

REFBK-0002355

ी ॥

# लहानशी प्रस्तावना.

१ द्वापर युगाच्या अखेरीच्या कालांत श्रीकृष्ण जन्मले. आर्य-कालमापन पद्धतीनें गणना केली तर द्वापरयुगाचीं एकंदर वर्षे ८६४००० मानलीं आहेत. त्यांतील शेवटचा १००० वर्षांचा काल श्रीकृष्ण जन्माचा धरला व त्यांत गत कलीचीं ५०२२ वर्षे मिळविलीं म्हणजे एकंदर ६०२२ वर्षे होतात. व हल्लींच्या पद्धतीनें विचार केला तर कारव पांडवांचें महायुद्ध झाल्यास पांच हजार वर्षे झालीं असावित, असें मानण्यांत आलें आहे. म्हणजे श्रीकृ-ष्णाचे जन्माला निदान पांच हजार वर्षे होऊन गेलीं असावित, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

२. चार युगें व दहा अवतार ह्यांची मीमांसा म्हणजे सृष्टीच्या उत्क्रांतीचा इतिहास. त्यावरून सृष्ट्युत्पत्ति म्हणजे " पिंडब्रम्हां-डाच्या " उत्क्रांताच्या कालाचा व तिच्या क्रमवार वाढीचा इति-हास समजतो. युगें काल दाखवितात व दशावतार उत्क्रांतीचा क्रम दाखवितात. ह्याच विचारसरणीवरून असेंही दिसून येतें कीं प्रत्येक सजीव पिंडाला दशावतारांच्या दहा स्थितींतून जावें लागतें. ह्या दहा अवस्था प्रत्येक पिंडाच्या पायऱ्या आहेत. " पिंडब्रह्मांड न्यायानें "— जें पिन्डीं तें ब्रह्मांडीं–हें तत्व अबा-धित आहे. आणि म्हणून ज्या क्रमानें प्रत्येक सजीव पिंडाची

वाढ होत जाते त्याच क्रमानें व त्याच अवस्थांतरांतून ह्या ब्रह्मांडाची–अखिल सृष्टीची–उत्क्रान्ती झाली असली पाहिजे, असें * दशवतार मीमांसेवरून समजणारें आहे.

३. श्रीकृष्णाचा अवतार हा दशावतारांतील आठवा अवतार आहे. व सर्व अवतारांत हाच अवतार फार मोहक, फार कार्यक्षम व विलक्षण कर्तृत्ववान् मानला आहे. श्रीकृष्णांनीं गीतोपदेशाचें गायन करून सर्व जगताला मोहून टाकणारी मोहनी पसरली आहे म्हणून श्रीकृष्ण चरित्र " मोहक " झालें आहे. श्रीकृष्णांनीं कौरव पांडवांचे युद्धांत जी कामगिरी केली आहे त्यावरून श्रीकृष्ण हे सर्व कामांत कसे निपूण होते, हें त्यांनीं आपल्या मुत्सद्दीपणानें जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे, म्हणून श्रीकृष्ण चरित्र हें " कार्यक्षम " झालें आहे. आणि तसेंच निरनिराळ्या बिकट प्रसंगीं कसें वर्तन करणें हितावह आहे व नीति दृष्ट्या कसें विहित असतें, हें श्रीकृष्णांनीं आपल्या स्वतःचे वर्तनावरून व त्याप्रमाणें आपल्या अनुयायांकडून व भक्तांकडून वर्तन करवून दाखविलें आहे, म्हणून श्रीकृष्ण चरित्र हें " विलक्षण कर्तृत्ववान " झालें आहे.

४. श्रीकृष्णांनीं आपल्या अवताराचें कारण गीतेंत सांगितलें आहे. व जेव्हां जेव्हां तशी स्थिती येते व येईल तेंव्हां तेंव्हां मीच अवतार घेईन, असें मानव जातीस अश्वासन देवून ठेविलें आहे. श्रीकृष्ण असें म्हणतात:—

---

* दशावतारमीमांसा नांवाचें पुस्तक लवकरच बाहेर पडेल.

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृज्याम्यहम् ॥
( गी. अ. ४ श्लो. ७ )

ह्याचा अर्थ श्रीज्ञानेश्वरांनीं किति मोहकपणें सांगितला आहे तो पहा:—

जें धर्म जात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें ॥
ऐसा ओघु असे हा स्वभावें । आद्य असे,
ह्मणोनि ॥ अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्तपण
ही नाठवीं ॥ जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्मुहा॰

हा मोहक अर्थ विशद करून सांगितला पाहिजे, तो असा:— प्रत्येक युगांत सर्व प्रकारच्या धर्मांचे रक्षण करावें, हें माझें स्वाभाविक कर्तव्य आहे. म्हणून ज्यावेळीं अधर्म धर्माला बुडविण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळीं मी माझें अजत्व ( जन्म न घेण्याचा गुण ) बाजुस ठेवून व अव्यक्तपणाचीहि आठवण सोडून जन्म घेतों. ज्या " श्रीकृष्ण पद्यहाराला " ही प्रस्तावना लिहिण्यांत आली आहे त्यांत कवीनीं श्रीकृष्ण जन्माचें प्रयोजन दुसऱ्या व तिसऱ्या पद्यांत असेंच वर्णन केलें आहे.

५ श्रीकृष्णांनीं ह्याप्रमाणें आपल्या अवताराचें कारण सांगून आपण जन्म घेतल्यावर काय करणार व तें आपलें कार्य झाल्यावर सर्व विश्वांत काय होईल, हें पण तेव्हां म्हणजे पांच हजार वर्षांपूर्वी गीतेंत सांगून ठेविलें आहे. ह्या पद्यहारांत कवीनें श्रीकृष्णाच्या गर्भावस्थेंत देवकीला जे डोहाळे होत होते त्यांचें वर्णन करून श्रीकृष्णाच्या अवतार कृत्यांचा उल्लेख काव्यरूपांत पद्यांत वहारीनें केला आहे.

वाढ होत जाते त्याच क्रमानें व त्याच अवस्थांतरांतून ह्या ब्रह्मांडाची–अखिल सृष्टीची–उत्क्रान्ती झाली असली पाहिजे, असें * दशवतार मीमांसेवरून समजणारें आहे.

३. श्रीकृष्णाचा अवतार हा दशावतारांतील आठवा अवतार आहे. व सर्व अवतारांत हाच अवतार फार मोहक, फार कार्यक्षम व विलक्षण कर्तृत्ववान् मानला आहे. श्रीकृष्णांनीं गीतोपदेशाचें गायन करून सर्व जगताला मोहून टाकणारी मोहनी पसरली आहे म्हणून श्रीकृष्ण चरित्र " मोहक " झालें आहे. श्रीकृष्णांनीं कौरव पांडवांचे युद्धांत जी कामगिरी केली आहे त्यावरून श्रीकृष्ण हे सर्व कामांत कसे निपूण होते, हें त्यांनीं आपल्या मुत्सद्दीपणानें जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे, म्हणून श्रीकृष्ण चरित्र हें " कार्यक्षम " झालें आहे. आणि तसेंच निरनिराळ्या बिकट प्रसंगीं कसें वर्तन करणें हितावह आहे व नीति दृष्ट्या कसें विहित असतें, हें श्रीकृष्णांनीं आपल्या स्वतःचे वर्तनावरून व त्याप्रमाणें आपल्या अनुयायांकडून व भक्तांकडून वर्तन करवून दाखविलें आहे. म्हणून श्रीकृष्ण चरित्र हें " विलक्षण कर्तृत्ववान " झालें आहे.

४. श्रीकृष्णांनीं आपल्या अवताराचें कारण गीतेंत सांगितलें आहे. व जेव्हां जेव्हां तशी स्थिती येते व येईल तेंव्हां तेंव्हां मीच अवतार घेईन, असें मानव जातीस अश्वासन देवून ठेविलें आहे. श्रीकृष्ण असें म्हणतात:—

---

* दशावतारमीमांसा नांवाचें पुस्तक लवकरच बाहेर पडेल.

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृज्याम्यहम् ॥
( गी. अ. ४ श्लो. ७ )

ह्याचा अर्थ श्रीज्ञानेश्वरांनीं किति मोहकपणें सांगितला आहे तो पहा:—

जें धर्म जात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें ॥
ऐसा ओघु असे हा स्वभावें । आद्य असे,
ह्मणोनि ॥ अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्तपण
ही नाठवीं ॥ जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्मुहा॰

हा मोहक अर्थ विशद करून सांगितला पाहिजे, तो असा:— प्रत्येक युगांत सर्व प्रकारच्या धर्माचे रक्षण करावें, हें माझें स्वाभाविक कर्तव्य आहे. म्हणून ज्यावेळीं अधर्म धर्माला बुडविण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळीं मी माझें अजत्व ( जन्म न घेण्याचा गुण ) बाजुस ठेवून व अव्यक्तपणाचीहि आठवण सोडून जन्म घेतों. ज्या " श्रीकृष्ण पद्यहाराला " ही प्रस्तावना लिहिण्यांत आली आहे त्यांत कवीनीं श्रीकृष्ण जन्माचें प्रयोजन दुसऱ्या व तिसऱ्या पद्यांत असेंच वर्णन केलें आहे.

५ श्रीकृष्णांनीं ह्याप्रमाणें आपल्या अवताराचें कारण सांगून आपण जन्म घेतल्यावर काय करणार व तें आपलें कार्य झाल्यावर सर्व विश्वांत काय होईल, हें पण तेव्हां म्हणजे पांच हजार वर्षांपूर्वी गीतेंत सांगून ठेविलें आहे. ह्या पद्यहारांत कवीनें श्रीकृष्णाच्या गर्भावस्थेंत देवकीला जे डोहाळे होत होते त्यांचें वर्णन करून श्रीकृष्णाच्या अवतार कृत्यांचा उल्लेख काव्यरूपांत पद्यांत वहारीनें केला आहे.

६. ह्या कारणासाठीं श्रीकृष्णांनीं अवतार घेऊन जें कार्य केलें आहे त्याचा व्यापक दृष्टीनें विचार केला म्हणजे सहज दिसून येतें कीं, श्रीकृष्ण चरित्र एकांगी नाहीं. तें अनेक अंगांनीं पूर्ण भरलेलें आहे. व ह्या त्याच्या सर्वव्यापी कृत्यावरून व्यास महर्षिनीं श्रीकृष्णाला

॥ कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥

असें म्हणून प्रणाम केला आहे, तसा आपणही ह्या उत्सव प्रसंगीं मोठ्या प्रेमानें व भक्तीभावानें श्रीकृष्णाला जगद्गुरु मानून प्रणाम करूं या.

७. श्रीकृष्णाच्या अनेकांगी चरित्रावरून त्याला पूर्णावतार मानतात. त्याला **पुरुषोत्तम** म्हणजे Superman ह्मणतात आणि त्याला **नारायण** म्हणतात. तसेंच ज्या भक्ताचा संमोह दूर करून त्याला आपलें कर्तव्यकर्म करावयास लावले त्या त्याच्या परम स्नेह्याला म्हणजे अर्जुनाला व्यासानीं "नर" म्हटलें आहे. हीच "नरनारायणाची" जोडी महाभारतांत मोठी कर्तृत्ववान दुकल होऊन गेली व श्रीकृष्णानीं आपल्या ह्या प्रिय भक्ताला पुढें करून त्याच्याकडोन व त्याचेसाठीं आपली कामगिरी बजाविली आहे. श्रीकृष्णानीं आपल्या भक्ताला— अर्जुनाला प्रतिपादीलें गीतेचें तत्वज्ञान संसाऱ्याला व संन्याशाला, अर्थवाद्याला व ज्ञान्याला, धार्मिकाला व मुत्सद्याला, जाणत्याला व नेणत्याला,—सर्वांना पद्धतशीर समभावानें मानवी उत्क्रांतीचा बिनचुक मार्ग दाखविणारें आहे आणि म्हणून कर्मज्ञानप्रधान गीता मानवी जीवनाच्या उत्क्रान्तीच्या क्रमवार पायऱ्या दाख-

2344

विणारी सोपानपरंपरा आहे व त्यांतील प्रमेयांप्रमाणें व श्रीज्ञानो-बारायांनीं प्रतिपादिलेल्या कर्ममार्गाला अंगिकृत करून जर प्रत्येक मानवी प्राण्यानें आपली भूमिका योग्य रीतिनें बजाविली तर समाजांतील विषमता नाहींशी होऊन प्रत्येक व्यक्तीच्या अंगची कार्यक्षमता पूर्ण विकास पावेल. प्रत्येक व्यक्ति कार्यक्षम बनून तिनें आपलें कर्तव्य श्रीकृष्णाच्या उपदेशाप्रमाणें बजावलें तर मानवीजीवनाचें कार्य सफल होऊन श्रीज्ञानेश्वर म्हणतात त्या प्रमाणें " सत्सुखें विश्व कोंदे "- असा परिणाम झालाच पाहिजे. व म्हणून अशा अवतारी पुरुषांचे जन्मोत्सव करण्याचा हेतू असाच असला पाहिजे कीं त्या योगें आमच्या हल्लींच्या पिढींतील तरुण मंडळांत " कर्मकरून तें ईश्वरार्पण करण्याची भावना " दिवसानु-दिवस वाढत जाईल.

८. श्रीकृष्ण चरित्राचा इतिहास परस्पर दोन विरुद्ध अशा पद्धतीनें आपल्या वाङ्मयांत ग्रथित झालेला आहे. महाभार-तांतील चरित्र वेगळें व भागवतांतील चरित्र वेगळें. महाभार-तांतील चरित्र इतिहासाला धरून असून तें विवेकात्मकबुद्धीला पटणारें आहे. परंतु भागवतांतील चरित्र हें भावनावश अज्ञजन-तेला रंजविणारें कादंबरीवजा बनविलें आहे. तें अलिकडच्या लोकांना पटणारें नाहीं व ह्मणून त्या कादंबरीवजा चरित्रांतील उत्सव पद्धती व तींतील प्रकार त्यांना आवडत नाहींत. दहीहंडी फोडून तिच्या खालीं टिपऱ्यांचा खेळ खेळून नाचणें व " कृष्ण-कृष्ण, जयजय कृष्ण " असा एकच घोष करून नादब्रम्हीं तल्लीन होऊन जीवशिवाचें साधर्म्य दाखविणारी वृत्ति अंगीं बाणणें—हा

जो दहीकाल्याचा गूढ उद्देश-तो विवेकात्मकबुद्धीच्या लोकांस पटत नाहीं, परंतु अज्ञजनसमुहास जरी त्यांतील तत्व समजत नसलें तरी त्यांची केवळ भावनावशवृत्ति असते म्हणून गतानुगतिक प्रचाराप्रमाणें त्यांतच त्यांना आनंद वाटतो. व तो आनंद त्यांनां भोगू द्यावा, हें आपलें कर्तव्यच आहे. पण ज्यांना हे असले प्रकार ह्मणजे धांगडधिंगा वाटतो-जरी हल्लीं हे प्रकार कमी झाले आहेत-तरी साक्षर म्हणविणाऱ्या समाजानें आपण कांहींच करूं नाहीं, हें मात्र उचित नव्हे. उन्नत्त होऊं पाहणाऱ्या जनसमुहाला जर तसले प्रकार नकोसे असतील तर ते त्यांनीं बंद केले आहेतच. ह्मणून आमच्यांत त्या अज्ञजनसमुहापेक्षां उच्चतर प्रीतभेचा उदय झालेला आहे, असें दाखविणारे " **ज्ञानयज्ञरूपी उत्सव** " झाले पाहिजेत. मुलींच्या भातुकलीच्या खेळांतल्या प्रमाणें दगडाच्या गोळ्याला अंगडें, टोपडें व कुंचलें घालून हरिदासांनीं त्याला कृष्ण समजून " जो जो जो जोरे, " असें गाणें म्हणून भक्तीभावाचा उमाळा आणणारे कीर्तन केलेलें ज्यांनां आवडत नाहीं व पटत नाहीं त्यांनीं त्या ऐवजीं श्रीकृष्णाच्या गीतेंतील प्रभावशाली संदेश जनतेला सांगण्याचें प्रसंग अशा उत्सवांत आणले पाहिजेत. अशा साक्षरमंडळानें श्रीकृष्णानीं मानव जातीच्या उन्नतिसाठीं व राष्ट्रधर्माच्या प्रगतीसाठीं धर्मवीर, व खरा मुत्सद्दी-**पुरुषोत्तम-जगद्गुरु**-अशा तीन निरनिराळ्या भूमिका आपल्या स्वतःच्या चारित्र्यानें बजाविल्या व धार्मिक आणि सामाजिक बाबतींत अखिल मानवजातीचें गुरुपद मिळविलें-ह्या व अशाच प्रभावशाली गोष्टींचें उद्घाटण करणारे **ज्ञानयज्ञ** अशा उत्सवांत झाले पाहिजेत. व अर्जुनाच्या मनांत मोह

सं. काव्य ८०८



उत्पन्न होऊन जी कर्तव्यपरांगमुखता आली होती त्याची हंडी फोडून निश्चित तत्वनिर्णयाच्या ब्रम्हज्ञानदुग्धाचा त्याच्यावर वर्षाव करून श्रीकृष्णांनीं अर्जुनाला जसा कार्यतत्पर केला व त्याला आपलें कर्तव्य करावयास लावले व माजलेला अधर्म बुडवून जगाची नवी घडी बसण्यास नवीच भूमिका निर्माण केली तसें हल्लींच्याकाळीं गीतेंतील संदेशाप्रमाणें कर्तव्यभूमिका तयार होतील असे **ज्ञानयज्ञ** असल्या उत्सव प्रसंगीं करणें, हें साक्षर जनतेचें कर्तव्य आहे. व अशा ज्ञानयज्ञांतील ज्ञानरूपी यज्ञकुंडांत कुकल्पनारूपी समिधा घालून संघशक्तीरूपी स्नेह म्हणजे तूप-त्याच्या आहुती देवून अज्ञानाचा नाश होऊन **समभाव प्रगट** होईल अशा उच्चतम हेतूनें " **ज्ञानहोम** " केले पाहिजेत. स्वार्थ-त्याग केला पाहिजे तरच इष्ट फलप्राप्ति होईल.

९. श्रीकृष्णांनीं आपल्या भक्ताला सांगितलेला संदेश आज आपण श्रीकृष्णजयंतीच्या उत्सवप्रसंगीं विचारांत घेऊन आचा-रांत उमटविला पाहिजे. श्रीकृष्ण भगवंताच्या जगद्गुरुत्वाची आज जगाला जरूरी आहे. हल्लींच्या काळांतील सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय प्रमेयांच्या अनेक भानगडीच्या गोष्टींना सुव्य-वस्थित उत्क्रान्तीच्या मार्गावर आणण्यासाठीं श्रीकृष्णासारख्या जगद्गुरुच्या संदेशाप्रमाणें कार्यकर्तृत्व करून दाखविणाऱ्यांना कर्तव्यतत्पर करण्यासाठीं त्यांनीं जो उपदेश केला आहे, तो प्रत्येक साक्षर म्हणविणारानें आपल्या आचरणांत आणला पाहिजे. तरच अशा उत्सवाचा सर्व जनतेच्या मनावर इष्ट परिणाम होईल. तो संदेश असा:—

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ॥
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ट परंतप ॥

( गी. अ. २ श्लो. ३ )

ह्याचा अर्थ किति उत्तेजक आहे तो पहाः—श्रीकृष्ण अशा लोकांना उत्तेजन यावें म्हणून म्हणतात—हे पार्था ! अशा दुर्बलपणास प्राप्त होऊं नकोस. हें मानसिक दौर्बल्य तुझ्या सारख्यांचे ठिकाणीं उचित दिसत नाहीं. हे परंतप, ! म्हणजे शत्रुंना संताप देणाऱ्या अर्जुना ! हा क्षुद्र हृदयाला चिकटून राहणारा दुर्बलपणा टाकून दे व तूं आपलें कर्तव्यकर्म करण्यासाठीं उठ. ह्या उपदेशाप्रमाणें वागण्याची सर्वांस नम्रपणें प्रार्थना करतों.

१० श्रीकृष्णांनीं पुढें आपलें विराटरूप दाखवून अर्जुनाची खातरी पटऊन दिली आहे कीं, संहितेंत म्हटल्याप्रमाणें ( आब्रम्हस्तंबपर्यन्तं सर्वम् कृष्णं चराचरम् ) सर्वांभूति परमात्म्याचें एकच तत्व भरलेलें आहे. ह्याचें वर्णन कवींनीं पद्याहाराच्या २८ व्या पद्यांत फारच सुंदर केलें आहे. तीं पद्यें प्रत्येकानें तोंडपाठ करण्या योग्य आहेत.

दादर. श्रावण वद्य ५ शके १८४५ } के. बी. टी. मंडळाचा अभिमानी.

—:०:—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३५५५

# श्रीकृष्ण जन्म पद्यहार

## ईश प्रार्थना.

( पदः—पंचतुंड नर० )

अनंत मूर्ते ! स्थिरचरव्यापक ! भो ! विश्वंभर ! भगवंता
॥ धृ० ॥ दुष्टदमन तूं भवभय हरणा ॥
करुणावंता, धीमंता ! ॥ अनंत मूर्ते ॥ साही, चारी,
अठरा थकलीं, परि न पार तव, गुणवंता लीला—नाटक
सूत्रधार तूं, पूर्णानंदाचे बलवंता ॥ अनंतरूप,
अलौकिक अभिनव सुंदर, कवणहि न शके वानाया,
अगम्य अज अव्ययपद नमितों सुमति
द्यावि, जीवन तनया ॥ अनंत मूर्ते ॥ १ ॥

( पदः—धनहीन असा होय )

( अवतार प्रयोजन, गीता अ. ४ श्लोक ७–८ )

दुष्टछळें भारभूत हो वसुंधरा ॥ धृ० ॥ पाप ताप
सुजन जना होय दुर्धरा ॥ लोपुनि सद्धर्मनीती-॥

पंथ सत्यता ॥ हीन कर्म पुण्य विफल बवुनि ॥
तत्वता ॥ चा० ॥ त्याकारण अवतरणें पडत प्रभुवरा ॥
दुष्टछलें ॥ २ ॥

## पदः—( शशिकुल भूषण )

### ( कंसाचें दुष्ट वर्तन )

कंसें क्रूर कर्म केलें ॥ देवकि गर्भ सहा वधिले
उभयां दावि बंदि शाळा ॥ विधिचें लिखित कसें
झाला ? ॥ सुजना, धेनूद्विजवृंदा ॥ छळिलें कळलें ॥
गोविंदा ॥ चा० ॥ अनंतासि मग अनंत वदती
घेऊं चला अवतारा जगतीं ॥ तरिच मिळे या विश्वा-
सुगती ॥ दुष्ट न जरि मेले ॥ तरि मम श्रीदचि ॥
मावळलें ॥ कंसें क्रूर कर्म केले ॥ ३ ॥

## ( पदः— राग हमीर कल्याण )

बोले धरणीधर देवा ॥ तूंच अवतार जगीं घ्यावा ॥
खल-दल-बल-मद निवटावा ॥ चा० ॥
पूर्वी बंधुसौमित्र तुझी मीं केली बहुत सेवा ॥
टाकुनि कपटकुटिलभाव ॥ प्रेमें हसत ॥ चा० ॥
प्राण विसाव्या भक्तसख्या कां धरीसि द्वैत-
भाव ॥ धरणी ॥ ४ ॥

## पदः—( महाराज आज आपुली० )

तूंच एक पाठरक्षिता खरा रणस्थळीं,
सत्य प्राणमित्र, भक्त अन्य तो नसे मुळीं,
कृत्य कोणतेंहि तें घडेल कां तुझ्या विना,
सांग सांगरे रुचे असेंच काय त्वन्मना ! ॥ ५ ॥

## पदः—( लक्षाला जातो मी. )

क्षणभरि मज मुळिं न गमे बा, तुझ्या विना ॥ ध्रु० ॥
जिवलग जीव प्राण सख्या, सदय लोचना ॥ चा० ॥
लक्ष्मण तूं बंधु होसी, सेवाधन अतुल देसी,
लंकारण जिंकिलेंसि ॥ चा० ॥ आतां मम ज्येष्ठ-
बंधु होई सन्मना । क्षणभरि मज० ॥ ६ ॥

## पदः—( तेथेंच उभी कीं होत० )

जा देवकी गर्भी राही । बळिभद्र सहोदर होई
जिवलगा ॥ घाडितो योग मायेला ॥ ती काढिल
तेथुनि तुजला ॥ जिव० ॥ ठेवील रोहिणी उदरीं हो
नंदसुता अवधारी ॥ ते स्वयें ॥ मथुरेस पुन्हां येईन
देवकी उदरिं जन्मेन ॥ जिवलगा ॥ जन्मतांच
गोकुळीं येतो ॥ प्रियबंधु भेट तुज देतों ॥ जिवलगा
॥ चाल ॥ गोरक्षमिषें दुष्टांसनिवटु, सुष्टांस सुखवुं हें
पाही ॥ संकर्षण एकुली जाई ॥ तेथवां ॥ जा० ॥ ७ ॥

## ॥ साकी ॥

देवकी गर्भी गर्भ सातवा संकर्षण तो राही,
गर्भतेज मंदिरीं विराजत रविकिरणापरि पाहीं,
देवकी वसुदेवा ॥ कळवी हितमित मनभावा ॥ ८ ॥

## पदः—( तिलोत्तमा मेनिका० )

### ( देवकीचे डोहाळे )

सहा वेळ मी गर्भिणि झाले, नवल वाटतें या वेळीं,

आकाशातें हात देऊनी उचलावी पृथ्वी सगळीं,
वाटतसे मज सप्तसमुद्रां नखाग्रिं सांठवुं कीं काय ?
हातीं घेऊनि नांगरमुसळा कंसाला मर्दूं काय ?
खलवलदमना पूर्ण करुनिया, साधुजनांतें सुखवावें,
वीरवाणि वसुदेव ऐकुनी, बोलतसे प्रेमल भावें,
अभिनव करणी भगवंताची, अनंत न कळे कवणाला,
इतका तरी वांचवो, दयाघन विजयी करो स्तवितों
त्याला ॥ सहा वेळ ॥ ९ ॥

अंजनीगीतः–( राजा लुटी. )

सात मास लागत गर्भाला,
निद्रित देवकी वसुदेवाला
पाहुनि मिळली त्या मायेला,
संधि पहा कैसी ॥ १० ॥

दिंडीः—(राग भैरवी अ० लीलांबरी )

अनंताची अनिवार योगमाया,
अखिल ब्रम्हांडें तीच ये रचाया,
करुनि रक्षण विलयास तीच नेते,
विविधयोनीला तेच हिंडवी ते ! ॥ ११ ॥

—:०:—

निर्गुणाला सगुणत्व होय देती,
निराकारा आकार देइ स्फूर्ती,
अनामासी जे ठेवितसे नाम !
तेच धरवी अवतार सौख्यधाम ॥ १२ ॥

॥ साकी ॥

निद्रित असतां रोहिणिउदरीं गर्भ सात मासाचा,
रविबिंबासम सुप्रभ ऐसा दिव्य अतुल तेजाचा,
उद्भव तो होई ॥ माया कौतुक हें पाही ॥ १३ ॥

पदः—( मज लावण्याची खनि० )

सति रोहिणि विनवि भगवंता
प्रभु ठेवितसे चरणीं माथा ! ॥ चा० ॥
संनिध नसतां कांत हे परी,
चिंता वन्ही भडके अंतरीं,
जन निंदिति करुं काय कशीपरी,
॥ चा० ॥ तुजविण न दिसे त्राता ॥ १४ ॥

पदः—( लक्ष्मी सम चंचल )

अभिनव नव कौतुक हे दावि श्रीहरी ॥ धृ० ॥
आकाशीं देववाणी होय यापरी,
चिंतातुर रोहिणि तूं हाई ना मनीं,
सत्य वसुदेवगर्भ घेई जाणुनी,
॥ चा० ॥ जन्मा भोगिंद्र सुमन । करण्या,
ये दुष्टदमन ॥ ऐकुनि जन तृप्त सुमन,
॥ चा० ॥ भरतां नवमास पुत्र लाभ हो तरी ॥ १५॥

पदः—( नच सुंदरि० )

गर्भ जिरे देवकिचा ॥ धाक प्रबल कंसाचा,
समज असाच जनाचा । नकळे खेळ प्रभूचा,

भाग्य रवी रोहिणिचा ॥ उगवे यापरि साचा,
॥ चा० ॥ गर्भ यशोदे उदरीं हो, हरि मायेचा,
कवणा पार न त्याचा ॥ १६ ॥

**पदः—( भूपती खरें तें वैभव. )**

कंसास दूत सांगती नृपा अनुरागी ॥ धृ० ॥
देवकीगर्भ जिरलाच जागचे जागीं,
तव भीतितेज काळासि कांपवी ऐसें !
होईल सिद्ध, महाराज, इच्छिती जैसें ॥ चा० ॥
वदतसे कंस संभाळा आठवा,
राहूनि दक्ष दिनरजनीं आठवा !
मम क्रूरकाळ जणुं वाटे आठवा ॥ चा० ॥
आसनीं, शयनीं, भोजनीं, सकलही जागीं,
आठवा दिसत दुःखदा, मनोमयभागीं ॥ १७ ॥

**पदः—( हें मना, सोड कल्पना. )**

श्रीहरी । क्षीरसागरीं । सौख्य निर्भरी । सिंधु तनयेसि,
अज्ञापित या परि प्रेमलभावें तिजसी,
वैदर्भदेशभूपती । सुगुणसन्मती । अतुलबल धृती
तिथें जन्मासि तूं घेई, मीहि जन्मतों जाण मथुरेसी,
॥ चा० ॥ यशवदा उदरिं ये माया ॥ जाणणें,
देवकिस होइन मी ही ॥ मानणें,
अघटीत चित्रकृति होई ॥ ऐकणें ॥ चाल ॥
अवतार कृत्य यापरी । जाण अंतरीं । लाग सत्वरी ।
भावी कार्यासी ॥ जातसे इंदिरा वंदुनिया श्रीहरिसी ॥

सं॰ काव्य ग्रन्थ



अंजनीगीतः—( राजा लुटी. )

गर्भवती ते देवकि झाली,
खळबळ दमनी वेळचि आली !
ब्रम्हानंदीं तन्मय झाली डोलत स्वानंदें ॥ १९ ॥

पदः—( साध्य नसे मुनि कन्या. )

काय नसे तुज चिंता ॥ धृ० ॥ पुसत
पहा वसुदेव अशा परि, पाहुनि निर्भय कांता,
वसत तुझ्या मनिं, ॥ खेद न कांहीं;
कंस जपे अठव्यासचि पाहीं,
भय शंका तुज तिळभरि नाहीं,
सांग सखे मज आतां.
॥ चा० ॥ पुसत पहा ॥ पोटीं विदेही अवतरतो ही ॥
भान नसे, ते होय विदेही, ॥ श्रीहरिविण
तिस दिसतचि नाहीं ॥ वदत असे प्रिय नाथा ॥
पुसत पहा ॥ २० ॥

पदः—( झंपा )

वदे देवकी बाहु स्फेपें पिटोनी,
कुठें कंस तो मारितो आपटोनी,
॥ चा० ॥ चाणुरादिक मुष्टिका, ॥ वैरि,
या क्षणीं मर्दु कां ॥ भूमि भारा टाकितो,
ऊतरोनी ॥ वदे देवकी ॥ २१ ॥

## पदः—( नृपाल० )

करीन मी सुखी सदैव जाण हे वसुंधरा,
वधोनि दुष्ट, सुष्ट हर्षवीन धर्म भूसुरा,
बंदिस्थान फोडुनी करीन बद्ध मुक्तता,
धनुष्यबाण आण, युद्ध मी करीन तत्वता,
॥ चा० ॥ काळयवन निर्दाळिन मी,
रचिन द्वारका पट्टण मी, ॥ पट्टराणि ते अणविन
मी, मारुनि भूपवरां ॥ २२ ॥

## पदः—( नृप तनयेवर हें मन माझें० )

जरासंध रथिं बांधुनि आणिन सत्यजाण सत्रा वेळां,
भौमासुरतो जिवोंचि मारुनि, निवटिन कौरव नष्टदळा,
जिवलग जिव कैवारास्तव मी सारथि होइन.
पार्थाचा ॥ खलबलदमना करण्या काराणिं ब्रम्हानंदचि,
मी साचा ॥ चा० ॥ मी भूवरी, अवतरे हरी,
स्थिर चरांतरीं ॥ मीच निर्भरी, उद्धरिता,
वंशकुळां ॥ जरासंध ॥ २३ ॥

## पदः—( माझी मति गुंगवी० )

जरा हळू वद, जरा हळू वद, मौन्य धरी कांते !
शांते ॥ कां गर्जसि तूं इतुक्या नेटे,
मात जरी हे बाहिर प्रगटे, ॥ अनर्थकारक
संकट लोटे ॥ मौन्य धरी कांते ॥ जरा हळू वद ॥ २४ ॥

पदः—( अष्टमूर्ति परमेश सदाशिव० )

वदत देवकी कांता केंची ब्रम्ह सनातन मी,
नर, नारी, कीं आणिक नोहे भिन्नचि त्याहुनि,
मी ! ॥ मायाचालक, पालक जाणे कर्ता हर्ता,
मी ! ॥ अपार ! अव्यय, मी अज, अजिता !
पूर्णानंदचि मी ! ॥ चाल ॥ प्रलयकाल मी द्रष्टा,
शास्ता ! मी गुण, निर्गुण मी ॥ वदत देवकी ॥ २५ ॥

पदः—( तिलोत्तमा मेनिका० )

सुधावचन हे बोलुनि देवकि भाव धरितसे,
मौन्याचा ॥ तों आकाशीं सुरवर सारे करिति,
गजर त्या दुदुंभिचा ॥ प्रगट अतां भगवंत–
होउनी, नाश करिल खल दुष्टांचा,
सकल दैवतें मिळुनि गुप्तते धरिति पंथ,
त्या मथुरेचा ॥ सूर्य, चंद्र, ब्रह्मादिक शंकर,
येति जिथें बंदिशाळा ॥ प्रदक्षणा त्या,
करुनि देवकिस, स्तविति ॥ गर्भिच्या,
जगपाळा ॥ सुधावचन हें ॥ २६ ॥

पदः—( दशरथ स्त्रीवचनें फसुनी० )

( गर्भस्तुति )

सच्चिदानंदा वनमाळी ॥ जय हरि नारायण गोविंदा,
सुरवर प्रतिपाळी ॥ मुकुंदा भो ! परमानंदा,
आनंदकंदा हो सर्वेशा सदया स्वानंदा, पुरातन
कमलासन ताता ॥ कमळ स्वरूपा । कमलनायका

जय भवभय त्राता ॥ विश्वपति वंद्य वेदपुरुषा,
कर्ममोचका ! काळनाशना ! पूर्ण करी आशा,
सच्चिदानंदा वनमाळी ॥ २७ ॥

## पदः—( जाऊं कामाला )

अनंत वेषाला । वंदु तुज पुराणपुरुषाला,
॥ ध्रु० ॥ अनंत पाणी । अनंत चरणा । अनंत
कल्याणा ॥ अव्ययरूपा । अपरंपारा । अनंत करि,
करुणा ॥ अनंत नामा । अनंत नयना, । अनंत
वदना तूं । अगुण ! अगण्या ! अगोचरा प्रभु !
पूर्ण करी हेतू ॥ आदिकारणा ! पतितपावना,
मंगल भगवंता ॥ चरणिं शरण सुरवृंद सकल हा,
ठेवि चरणिं माथा ॥ अनंतवेषाला ॥ २८ ॥

## ॥ साकी ॥

यापरि सुरवर गर्भस्तुतितें करुनि जाति निजस्थाना,
सुखानंद तो मनिं नच मावे, साधुसंत मुनि सुजना,
परि त्या कंसास । लागे अठव्याचा ध्यास ॥ २९ ॥

## पदः—( सुकुमार असुनी तूं फार० )

गर्भास किती हो, मास । कधीं नवमास । पूर्ण ते होती,
॥ ध्रु० ॥ कंसास आस, सेवकां पुसे तो कुमती,
रिपु कंस । मनीं धरि हांस । अवगुणातंस । भाव ॥
संचरला ॥ जाऊनि बंदिशाळेंत बघूं देवकिला,
आनंदरूप सतिरूप । बघत खल भूप । कृष्णपदिं,

सं. काव्य
५०५९



रमालि, कृष्णपदिं रमली ॥ हरिरूप चतुर्भुज मूर्ति,
सांवळी दिसली ॥ गर्भास० ॥ ३० ॥

पदः—( चल जाऊं समर कराया० )

दैदिप्यमान हरि मूर्ती । कंसास बघुनि घे स्फूर्ती,
आरक्त नयन दिसताती । तळपते सुदर्शन हार्ती,
करिं भव्य गदा, शंखाची । वर्णवे न शोभा ज्याची,
॥चा०॥ सुरकुंडि वळे कंसाची । दे हांक भयानें साची ।
बोबडी वळे रसनेची ॥चा०॥ रोमांच थरारुनि येती,
अडखळे, पळे, घे भीति ॥ दैदिप्यमान ॥ ३१ ॥

दिंडीः—( भैरवी )

कंस शस्त्रें आपटी मेदिनीस ॥
वदे मारिन मी कधीं आठव्यास ? ॥
गिळिन सगळा अठव्यास याच वेळे ! ॥
कंस क्रोधें गरागरा फिरवि डोळे ॥ ३२ ॥

पदः—( वीरा भ्रमरा, जन्मुनि सार्थक० )

श्रीकृष्णा जन्म काळ हा मथुरेला पातला,
विमानीं सुरवृंदहि लोटला ! ॥
सकल अंबरीं नाद दुंदुभि, दुमदुमुनी राहिला ॥
मुनिजन तृप्त डोलुं लागला ! ॥ चाल ॥
तों श्रावण वर्षाॠतुही लागला ॥
ये बुध अष्टमि वद्याची मंगला ॥ नक्षत्र रोहिणी,

सुखदा दिन भला ॥ चा० ॥ मध्यरात्रि परब्रम्ह-
सांवळा परमात्मा जन्मला ॥ चतुर्भुज देवकिनें,
देखिला ॥ दिव्य सुमन संभार प्रभूवरि ॥
सुरवृंदें वर्षिला ॥ आनंदी आनंदचि जाहला,
॥ श्रीकृष्णाचा ॥ ३३ ॥

## पदः—( माशिं बोलुं नका गोविंदा० )

श्रीकृष्ण जन्म ' हरिविजयीं ' श्रीधर कविनें वर्णिला,
हार हा सुगंधित सुम ओव्या पदवृंदीं गोंविला ॥
विद्यार्थि मंडला ऐक्य निदर्शक प्रेमें अर्पिला ॥
श्रीकृष्ण कृष्ण दुध कंठ सुशोभित करवो चांगला ॥
॥ चा० ॥ प्रार्थितों कृष्ण गोपाला ॥
दे भक्ति प्रेम ऐक्याला ॥
करिं घडवि धर्मसत्कृतिला ॥
हा सज्जन पदनत **जीवन नंदन** चरणीं लागला ॥ ३४ ॥

॥ साकी ॥

अनंत जन्मा शून्य कराया अनंत चरिता परिसा,
चित्तलोह हें घेई स्वर्णता, ज्ञानरूप या परिसा,
भेटे, सहज जरी ॥ होइल सार्थक जन्म तरी ॥ ३५ ॥

REFBK-0002355
REFBK-0002355

विद्यार्थी मंडळ–कुर्ला.

या संस्थेसंबंधीं

# चार शब्द.

१. सदरहु संस्था स्थापन करावी अशी कल्पना शके १८४४ च्या श्रावण वद्य अष्टमीस ह्मणजे गेल्या वर्षाच्या श्रीकृष्ण जन्माचे दिवशीं उत्पन्न झाली व ती कल्पना मूर्त स्वरूपांत आणून ह्या " विद्यार्थी मंडळाची " प्राणप्रतिष्ठा ता. १९ सपटेंबर सन १९२२ रोजीं झाली आहे. " मंडळ " हा शब्द फार व्यापक आहे. मंडळ म्हणजे " वर्तूळ " त्याचा मध्यबिंदु कायम ठेवून त्याची त्रिज्ज्या वाढवित गेलें म्हणजे वर्तुळाचें क्षेत्र वाढत जातें. तसें ह्या विद्यार्थी मंडळाचें कार्यक्षेत्र जितकें वाढविण्याचा प्रयत्न होईल तितकें तें क्षेत्र वाढेल, ही जाणीव मंडळाचे चालकांनीं लक्षांत ठेवावी. एका वर्षांत मंडळाची झालेली कामगिरी पहातां बरीच प्रगति झालेली दिसते. व मंडळाला कुर्ल्याच्या स्थानिक सद्गृहस्थांनीं आपली सहानुभूती दाखवून बरेंच सहाय्य केलें आहे, तें साक्षर मंडळीचें कर्तव्यच आहे, असें समजून त्यांनीं दिवसानुदिवस ह्या मंडळाचे कार्याला मदत करावी, अशी इच्छा मंडळाच्या चालकांची व मंडळाचा अभिमान धरणाऱ्यांची असणे सहाजिक आहे.

२ मंडळाचे अध्यक्ष श्रीयुत यशवंत अप्पाजी परळीकर व [चि]टणीस श्रीयुत प्रधान व इतर मंडळी यांनीं ह्या मंडळाच्या [का]र्यांत आपला अमुल्य वेळ खर्च केलेला आहे. ह्या त्यांच्या [स्]वार्थत्यागाबद्दल त्यांना योग्य तें फल देणार श्रीकृष्ण परमात्मा समर्थ आहे.

2345

मंडळासाठीं प्रसिद्ध करणार–रा. भरत महादेव प्रधान
सेक्रेटरी विद्यार्थी मंडळ कुर्ला.

जयवंत प्रिन्टींग वर्क्स दादर.